APRS BANK

# आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ

मुख्य कार्यालय गट नं. १६५१, हिंदु चौक, श्रीराम नगर, मेन रोड, रेंदाळ.
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

(फक्त भागधारक सभासदांचेकरीता)

बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविणेत येते कि, बँकेची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत रविवार, दि. १७/०८/२०२५ इ. रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता हिंदु चौक, श्रीराम नगर, मेन रोड, रेंदाळ येथील बँकेच्या स्व-मालकिच्या जागेत खालील विषयांवर विचार विनिमय करणेकरिता बोलविणेत आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१. मागील सभा दि.१४/०७/२०२४ रोजी झालेल्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांत वाचुन कायम करणे.
२. ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार ३१ मार्च २०२५ अखेरील नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. मा. संचालक मंडळाने सन २०२५-२६ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास व सन २०२४-२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५. सन २०२४-२५ च्या लेखापरिक्षणाबाबत मा. वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेणे. तसेच सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल मुदतीत वैधानिक लेखापरिक्षक यांना सादर केले आहेत त्यास मान्यता देणे.
६. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पोवार सामंत अँण्ड जाधव, चार्टर्ड अकौंटंटस, कोल्हापुर यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन मा. संचालक मंडळाने केलेल्या फेरनियुक्तीस रिझर्व बँकेची मंजुरी मिळालेली असलेने त्याची नोंद घेवुन केले कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देणे.
८. मा.संचालक मंडळाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत तपासणीसाठी प्राप्त अर्जामधुन सच्चिदानंद अँण्ड कंपनी,चार्टर्ड अकौंटंटस, कोल्हापुर यांची अतर्गत लेखापरिक्षक (इंटर्नल ऑडीटर) म्हणुन केलेली नियुक्ती व ठरविलेला मेहनताना यास कार्योत्तर मंजुरी देणे.
९. मा. संचालक मंडळाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता इन्कम टॅक्स ऑडिट व तत्सम कामासाठी प्राप्त अर्जामधुन बी.एम.एस.एच अँण्ड असोसिएटस एल.एल.पी.,चार्टर्ड अकौंटंटस,इचलकरंजी - पार्टनर संदिप चंद्रकांत बडवे,रेंदाळ यांची टॅक्स ऑडिटर म्हणुन केलेली नियुक्ती व ठरविलेला मेहनताना यास कार्योत्तर मंजुरी देणे.
१०. मा. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेनुसार सहकार खाते महाराष्ट्र शासन, यांचे नागरी सहकारी बँकांना लागू केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सहभाग घेतलेल्या व त्यानुसार कर्ज परतफेड केलेल्या कर्जदारांची नोंद घेऊन त्यास मंजुरी देणे.
११. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये कर्ज हप्त्याची नियमितपणे परतफेड करणाऱ्या सभासदांना मा. संचालक मंडळ सभेने मंजूर केलेल्या कर्जावरील व्याजातील रिबेट ला कार्योत्तर मंजुरी देणे.
१२. बँकेचे प्रचलित मंजुर पोटनियम क्रं. २ चे दुरुस्तीस मंजुरी देणे. (सदर पोटनियम दुरुस्तीचा मसुदा स्वतंत्रपणे वार्षिक अहवालात नमूद केलेला आहे.)
१३. या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१४. मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

दिनांक - ३०/७/२०२५
स्थळ- रेंदाळ

संचालक मंडळाचे आदेशानुसार
**श्री. सूर्यकांत शंकरराव जाधव**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना -**

१) गणसंख्येअभावी (कोरमअभावी) सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी ठिक ११.३० वाजता घेतली जाईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी गुरुवार, दि. १४/०८/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवाव्यात. पाठविलेल्या प्रश्नाचे उत्तर संबंधित सभासदास सभेच्या दिवशी देणेत येईल.
३) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रु. १०००/- असून ज्या सभासदांची भागधारणा त्यापेक्षा कमी आहे किंवा रु.१०००/- च्या पटीत भागधारणा केलेली नाही त्यांनी अपूर्ण भागभांडवलाची रक्कम लवकरात लवकर भरुन सहकार्य करावे.
४) ज्या नियमित सभासद खातेदारांनी सी-केवायसी (C-KYC) बाबतचे कागदपत्रांची अद्याप पूर्तता केलली नाही त्यांनी आपला ग्राहक ओळखा निकष (KYC Norms ) नुसारची कागदपत्रे (उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड व अद्यावत फोटो) व अद्यावत मोबाईल नंबर बँकेच्या संबंधित शाखेकडे सादर करावीत. तसेच ज्या सभासदांचे पत्त्यामध्ये बदल झालेला आहे त्यांनी बदल झालेल्या पत्त्याचा तपशिल लेखी स्वरुपात नजीकच्या शाखेत किंवा मुख्य कार्यालय, बोर्ड विभाग यांचेकडे सादर करणेचा आहे.
५) सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व पोटनियम दुरुस्तीचा मसुदा सर्व शाखांच्या नोटिस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला आहे. तसेच बँकेच्या www.aprsbank.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**टिप -**

बँकेने गत तीन वर्षापासून अवलंबिलेल्या पध्दतीनुसार ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल सभासदांना पोहाने / घरपोच पाठविलेला आहे. तथापि, ज्यां सभासदांना सदरचा अहवाल मिळाला नसलेस, त्यांनी बँकेचे मुख्य कार्यालय किंवा नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.

**पोटनियम दुरुस्तीचा मसुदा -**

| पोटनियम क्रंमाक | सध्याची पोटनियमातील शब्द रचना | प्रस्तावित पोटनियम दुरुस्ती शब्द रचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| पोटनियम क्रं. २ पैकी १ | बँकेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ जि. कोल्हापूर या पत्त्यावर असेल. | बँकेचे मुख्य/प्रधान व नोंदणीकृत कार्यालय आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ. गट नं. १६५१, हिंदु चौक, श्रीरामनगर, मेन रोड, रेंदाळ, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर या पत्त्यावर असेल. | बँकेने स्व-मालकिचे इमारतीत मुख्य / प्रधान कार्यालय स्थलांतरीत केले आहे. त्याबाबत रिझर्व बँकेला कळविले असुन त्यांचे पत्रानुसार पोटनियमात दुरुस्ती करुन त्यास सहकार खात्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे. |